५८


# पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे
## Pune Metropolitan Regional Development Authority, Pune

स. नं. १५२-१५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे - ४११ ००७

S. No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune - 411 007

**Ph. No. :** 020 - 259 33 344 / 356 / 333 I **फोन नं. :** ०२० - २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३ I **Email :** hqpmrda@gmail.com


## कार्यालयीन आदेश

**विषय** :- पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे खाजगी संस्थेमार्फत किंवा बांधकाम व्यावसायिकांकडून स्वखर्चाने करुन घेण्याबाबतच्या धोरणास मंजूरी मिळणेबाबत.

**वाचा** :- १) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. पुमप्रक्षेविप्रा/पासुआ/मुअ/२६/२०२५/२०१६ दिनांक : १७/०३/२०१६.

२) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दिनांक १३/०५/२०१६ च्या ६ व्या बैठकीतील ठराव क्र. ७१.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. AD सभा ६३/प्र.क्र.७२/शाखा - १ दि. १९/०५/२०१६.

## पूर्वपिठीका

दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजीच्या अधिसुचनेनुसार पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास (PMRDA) ' **नियोजन प्राधिकरण** ' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. सुमारे ६६१६.०० चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये नियोजन करुन सर्व पायाभूत सुविधांचा विकास करण्याची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. त्याकरीता प्राधिकरण किंवा शासनाकडून निधी उपलब्ध होईल त्यायोगे पायाभूत सुविधा तयार होतील. तथापि काही खाजगी विकासक किंवा इतर कोणीही स्वखर्चाने सार्वजनिक पायाभूत सुविधांचा विकास करत असतील तर त्यांना प्रोत्साहन देणे उचित होईल. सार्वजनिक निधीवरील ताण कमी करणे आवश्यक आहे. याकरीता प्राधिकरणाकडे कोणीही खाजगी व्यक्ती, संस्था स्वखर्चाने सार्वजनिक पायाभूत सुविधा तयार करीत असेल तर त्यांना अत्यंत तातडीने मान्यता देण्यात यावी. अर्थात अशी सुविधा निर्माण करतांना ते त्यांचा निधी वापरणार असल्याने त्यांना कमीत कमी प्रशासकीय अडथळे, त्रास होईल किंवा त्यांच्यावर अतिरिक्त खर्चाचा भार पडणार नाही असे धोरण केल्यास खाजगी व्यक्ती / संस्था आणखी जोमाने पुढे येऊ शकतील.

त्यानुसार अत्यंत वेगाने अशा परवानग्या खालील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे देण्यात याव्यात.

१) सदर योजना खालील सार्वजनिक सुविधांसाठी खुली असेल.

अ. रस्ते.

ब. उड्डाण पूल.

क. नदीवरील पूल.

ड. सांडपाणी व्यवस्था.

इ. पाणी पुरवठा.

ई. घनकचरा व्यवस्था.

फ. इतर कोणतीही सार्वजनिक सुविधा.

२) जी सार्वजनिक सुविधा असेल आणि ज्याचा सार्वजनिक वापर होईल अशा सुविधांचाच विकास करण्यास परवानगी देण्यात येईल.

३) या सुविधांची मालकी ही प्राधिकरणाची असेल आणि ही सुविधा प्राधिकरणाकरिता विकसीत करण्यात येत आहे असे समजण्यात येईल.

४) सदर सुविधेसाठी तांत्रीक मान्यता देण्याचे अधिकार प्राधिकरणाचे असतील व त्याबरहुकूमच ही सुविधा निर्माण करणे बंधनकारक असेल.

५) बांधकाम व्यावसायकांनी किंवा संबंधित संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

६) संबंधित व्यावसायीकास अथवा संस्थेस आवश्यक त्या स्थानीक संस्थेची / विभागांची ' ना हरकत प्रमाणपत्रे ' आवश्यक असल्यास प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येईल.

७) सदर सुविधांचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या सुविधांची मालकी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे राहील.

८) सदर सुविधेचे काम सुरु करण्यापासून ते अंतीम होईपर्यंत त्यावर तांत्रीक पर्यवेक्षण प्राधिकरणाचे असेल.

९) सदर पायाभूत सुविधांचा दोष निवारण कालावधी (Defect Liability period - DLP) पाच वर्षाचा राहील. त्या कालावधीत संबंधित खाजगी व्यक्तीस/संस्थेस त्या सुविधेची देखभाल व दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल.

१०) सदर पायाभूत सुविधांचे काम त्या खाजगी व्यक्तीस / संस्थेस / बांधकाम व्यावसायीकास स्वखर्चाने करावे लागेल. तथापि सदर सुविधेचा वापर सार्वजनिक हिताचा राहील.

वरील मुद्यासंबंधित खाजगी व्यक्ती / खाजगी संस्थेस / बांधकाम व्यावसायिकांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांना देणे ईष्ट होईल. तसेच या धोरणावर पायाभूत सुविधांची कामे खाजगी व्यक्ती / खाजगी संस्थेकडून करुन घेतल्यास पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये राहणा-या नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. सदरच्या धोरणास मान्यता देण्याचे विचारधीन आहे.

मा. सभा क्र. ३ दिनांक २८-८-२०१५ ठराव क्र. ३ अन्वये तातडीच्या प्रसंगीची खरेदी अथवा इतर कार्यवाही करणेबाबत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे यांना देण्यात आलेले आहेत. तसेच मा. अध्यक्ष यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये ठेवण्याचा ठराव घेण्यात आलेला आहे. त्यानुसार उपरोक्त धोरणास मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिली आहे. मा. अध्यक्ष यांनी घेतलेल्या या निर्णयाबाबतचा प्रस्ताव मा. सभेसमोर ठेवण्यात आला. त्यास मा. प्राधिकरण सभेने मंजूरी दिलेली आहे.

**आदेश :**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा नागरिकांना चांगल्या पध्दतीने उपलब्ध होण्यासाठी सदरची कामे खाजगी व्यक्ती / खाजगी संस्थेस / बांधकाम व्यावसायिकांच्या माध्यमातून त्यांचे स्वखर्चाने करावयाच्या धोरणास मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावास मा. अध्यक्ष, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार त्यामध्ये प्राधिकरण अथवा कोणत्याही सार्वजनिक निधीचा वापर होणार नसल्याने खाजगी व्यक्ती / खाजगी संस्था / बांधकाम व्यावसायिकांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांना देण्यात आलेले आहेत. मा. अध्यक्ष, यांनी घेतलेल्या या निर्णयास मान्यता देणेत येत आहे.

(महेश झगडे)
महानगर आयुक्त तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे (२५.०५.१६)

क्र.EG/पासुधो/०३.१६/प्र.क्र.२६/शाखा-१/७७/१६
दिनांक : २५/०५/२०१६

प्रत: १) मा. अध्यक्ष, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे तथा मा. पालक मंत्री, पुणे जिल्हा, यांचे स्वीय सहाय्यक

२) मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे यांचे स्वीय सहाय्यक.

३) महानगरनियोजनकार, (बांधकाम परवानगी), पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.

४) मुख्य अभियंता, (अभियांत्रिकी विभाग) पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.
५) महानगरनियोजनकार, (नियोजन), पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.
७) विशेष कार्य अधिकारी, (अनधिकृत बांधकामे ) पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.
८) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (प्रशासन विभाग), पु.म.प्र.क्षे.वि.प्रा., पुणे.